## राज्याचे जलसिंचन ४० टक्के झाल्यास

# शेतकरी आत्महत्या थांबतील

**नागपूर :** महाराष्ट्र राज्याची सिंचन टक्केवारी केवळ २३ टक्के आहे. ही टक्केवारी वाढवून ४० टक्क्यांपर्यंत नेल्यास राज्यात होणाऱ्या शेतकरी आत्महत्या नक्कीच थांबतील, असा विश्वास केंद्रीय भूपृष्ठ वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला आहे. यासोबतच राज्यातील समुद्रात वाहत जाणारे पाणी इतर नद्यांमध्ये वळविण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आपण लवकरच हातात घेणार असल्याचे ते म्हणाले. त्यामुळे उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्याचा पाण्याचा प्रश्न कायमचा सुटेल, असे ते म्हणाले.

राज्यातील अनेक नद्यांचे पाणी समुद्रात मिळते, त्यामुळे ते वाया जाते. त्याचा आपल्याला काहीच उपयोग होत नाही. ते पाणी इतर नद्यांकडे वळविल्यास पाण्याचा प्रश्न सुटू शकतो, असे गडकरी म्हणाले. दमणगंगेचे पाणी गोदावरी नदीत वळविण्याचा प्रकल्प हाती घेण्यात येणार आहे. त्यामुळे गोदावरीच्या खोऱ्यात येणाऱ्या उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाडा येथील पाणीटंचाई संपेल. जायकवाडी प्रकल्प नेहमी पाण्याने भरलेला राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. नागपुरात येत्या १० नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या 'ॲग्रो व्हिजन कृषी प्रदर्शना'बाबत पत्रकार परिषदेत माहिती देताना ते बोलत होते.

मराठवाड्याचा पाणीप्रश्न सोडविणार



### वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचे केंद्र उघडणार

विदर्भात सध्या उसाचे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जात आहे. त्यामुळे साखर कारखान्यांना चांगले दिवस आले आहेत. याआधी विदर्भातील साखर कारखाने चालू शकले नाहीत. मात्र, आम्ही तीन साखर कारखाने हाती घेऊन उत्तमरीत्या चालवून दाखविले आहेत. आता शेतकऱ्यांना उसाचे चांगले उत्पादन घेण्यासाठी माहिती देण्याची गरज आहे. त्यासाठी शरद पवार यांच्याशी आपले बोलणे झाले असल्याचे ते म्हणाले. शरद पवार हे वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचे प्रमुख आहेत. त्यांनी विदर्भात त्याचे केंद्र सुरू करण्यास मंजुरी दिली आहे. त्यासाठी गोसेखुर्द प्रकल्पाच्या क्षेत्रात ४५ एकर जागा निश्चित करण्यात आली आहे.